# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी** :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/विधि व न्याय/कक्ष-१४/अधिवक्ता तालिका /२०१७ /३४७४ दिनांक :२९ /०६/२०१७

प्रति,
मा. महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र राज्य, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील मा.उच्च न्यायालय, सहकार न्यायालये व सहकारी अपील न्यायालयापुढे प्राधिकरणातर्फे सहकारी संस्थांचे निवडणूक विषयक कामकाज करणा-या अधिका-यांची बाजू न्यायालयापुढे मांडणेसाठी प्रत्येकी एका वकीलास तालीकेवर घेणेबाबत जाहीर निवेदन शासकीय दराने प्रसिध्द करणेबाबत.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांना मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर व औरंगाबाद तसेच महाराष्ट्र राज्यातील सहकार न्यायालये व सहकार अपिल न्यायालयातील निवडणूकां विषयक वादामध्ये प्राधिकरण व प्राधिकरणाधिकृत निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे न्यायालयात हजर होऊन बाजू मांडणेसाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी पात्र व इच्छूक अधिवक्त्यांची प्राधिकरणाचे तालिकेवर नियुक्तीसाठी जाहीर निवेदनाव्दारे आवेदनपत्र मागविणेबाबतची जाहीरात महाराष्ट्र राज्यातील सर्व विभाग स्तरावर दि.२८/०६/२०१७ रोजी फक्त एक वेळच्या मधल्या पान क्र. ३ व ४ मध्ये प्रसिध्द करावी.

उपरोक्त निवेदन कमीत कमी जागेत व शासकीय दराने प्रसिध्द करून देयके विहीत नमून्यात व आकारात प्राधिकृत पत्रासह उपलब्ध करून देण्यात यावी.

**मा.आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे आदेशाने**

२९/०६/१७

**(यशवंत गिरी)**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत** –

१) मा.अपर मुख्य सचिव(सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२
२) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
४) सर्व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,

अ.क्र. ३ व ४ यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त जाहीर निवेदन त्यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई आणि खंडपीठ नागपूर आणि औरंगाबाद यांचे वकील संघाचे तसेच सहकार न्यायालयाचे व सहकार अपील न्यायालयाचे वकील संघाच्या सूचना फलकावर स्थानिक स्तरावरील वर्तमान पत्रामध्ये बातमीच्या माध्यमातून प्रसिध्द करावे.